ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– II

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

# द्वैत वेदांत : विचार व तत्त्वज्ञान

* डॉ. मिता मोहन शेणॉय

* माजी सचिव,मुंबई तत्वज्ञान सोसायटी ,तत्वज्ञान विभाग ,मुबई विद्यापीठ

**सारांश :**

द्वैत वेदांत हा वेदांत दर्शनाचा एक प्रमुख प्रकार आहे. तो एक वैष्णव संप्रदायही आहे. ह्या वेदांताची माहिती आणि महत्व फार कमी लोकांना असल्यामुळे व माझे संशोधन द्वैत वेदान्तावर आधारित असल्याने मला हा लेख लिहिण्याची प्रेरणा मिळाली. अनेक शतकांपासून भारतावर कित्येक परकीय आक्रमणे झाली. त्यात हिंदू धर्म, संस्कृती, प्रर्थनास्थळे, मंदिरे समूळ नष्ट करण्याचा प्रयत्न केला गेला. तसेच अनेक धर्मांतरे हि झाली. पण तरीही आपली संस्कृती वेद , सनातन धर्म किंवा हिंदू धर्म टिकविण्याचे इतकेच नव्हे तर भारतीय लोकांत भक्ती प्रेम एकता व विश्वास निर्माण करण्याचे महान कार्य केले. त्याचे श्रेय भारतीय संप्रदाय , पंथ , संतश्रेष्ठ , ऋषी मुनी व आचार्यांना द्यावे लागेल. मध्वाचार्य व त्यांचे द्वैत वेदांत हे त्यापैकी एक आहे.

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited

मध्वाचार्यांनी आपल्या द्वैत वेदांताची स्वतंत्रपणे स्थापना केली. ते आचार्य होते व त्यांच्या वैष्णव संप्रदायाला ब्रह्म संप्रदाय म्हणतात. द्वैत वेदांत मध्व मताप्रमाणे खालीलप्रमेय स्तोत्रात एका श्लोकात सांगितले आहे.

श्री मध्व मते हरी: परतर: सत्यं जगत तत्त्वत:<br>
भिन्ना जीवभावः हरेण्णू चराः निचोच्छभाव गती:।<br>
मुक्ति नैज सुखानुभूती: भक्तिशच ततसाधनं<br>
अक्षदित्रीतयं प्रमाणं अखिलाम्ना वैक वैद्यो हरी:।।

द्वैत वेदान्ताचे ठळक मुद्दे खालीलप्रमाणे

१) हरी (विष्णू ) सर्वोत्तम आणि स्वतंत्र आहे. इतर सर्व जीव व जड (चराचर ) त्यावर अवलंबून आहे.

२) हे जगत किंवा विश्व सत्य आहे.

३) ईश्वर , जीव ,आणि जड ह्यात भेद आहे. तो भेद पंचविध असून वास्तविक आहे.

४) बंध आणि मोक्ष हि वास्तविक आहेत.

५) जीव असंख्य असून ईश्वराचे अनुचर आहेत. त्यात भेदनी तारतम्य आहे.

६) मोक्ष (सर्वोच्च पुरुषार्थ ) म्हणजे स्वसुखाची अनुभूती.

ISSN–2277- 8721

Electronic International Interdisciplinary Research Journal

EIIRJ

Volume–XI, Special Issue– II

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

७) अमला भक्ती हे मोक्षाचे व ईश्वरप्राप्तीचे सर्वोच्च साधन आहे.

८) प्रत्यक्ष अनुमान आणि आगम हि तीन प्रमाणे आहेत.

९) वेदांचे समस्त तात्पर्य भगवान विष्णू म्हणजेच श्रीहरी आहे.

द्वैत वेदान्ताचे तत्त्वज्ञान पंचभेदावर, विष्णू सर्वोत्तम ह्या तत्त्वावर , जगत सत्यं ह्या वास्तववादावर अवलंबून आहे.

भेद पाच प्रकारचे आहेत आणि ते वास्तविक आहेत.

१) ईश्वर व जीव ह्यात भेद आहे.

२) ईश्वर आणि जग ह्यात भेद आहे.

३) जीव आणि जड ह्यात भेद आहे.

४)एक जीव दुसऱ्या जिवाहून भिन्न आहे.

५) जड दिसणाऱ्या वस्तू परस्परांपासून किंवा जडाचा एक भाग दुसऱ्या भागापासून भिन्न आहे.

कोणत्याही दोनात भेद असल्याचे मुख्य कारण म्हणजे विरुद्ध धर्म , सामर्थ्यांत व योग्यतेत वेगळेपणाद्वैत मताने शांकरमताचे खंडन केले. अद्वैत वेदांताप्रमाणे ब्रह्म आणि आत्मा ह्यात ऐक्य आहे आणि जगतमिथ्य आहे हे सिद्ध करण्यासाठी त्यांनी अहं ब्रह्मास्मि , तत्त्वमसि , सर्व खलु इदं ब्रह्म इ. श्रुती वाक्यांना प्रमाण मानले.

मध्वाचार्यांनी प्रमाणाचे दोन विभाग केले. केवल प्रमाण आणि अणूप्रमाणं. केवल प्रमाण हे तीन प्रकारचे ज्ञान आहे. ईश्वर प्रत्यक्ष ,योगी प्रत्यक्ष आणि अयोगी प्रत्यक्ष . ईश्वर प्रत्यक्ष हे श्रीविष्णूचे ज्ञान व लक्ष्मीचे ज्ञान आहे. ते सर्वश्रेष्ठ आहे.

पण लक्ष्मी ज्ञान ईश्वरज्ञानावर अवलंबून आहे. योगी ज्ञान हे साधना, उपासना इ. ने झालेले ज्ञान आहे. अयोगी ज्ञान तीन प्रकारचे असून त्यात मुक्ति योग्य जीवांचे यथार्थ ज्ञान, नित्य संसारी जीवांचे यथार्थ व अयथार्थ ज्ञान आणि तमोयोग्य जीवांच्या अयथार्थ ज्ञानाचा समावेश आहे.

अनु प्रमाण म्हणजे ज्ञानाची साधने . द्वैत वेदांत तीन प्रमाणे ( म्हणजे अनु प्रमाणे ) मानते. ती म्हणजे प्रत्यक्ष , अनुमान आणि आगम . द्वैत वेदांत प्रमाणाची व्याख्या “ यथार्थम् प्रमाणं “ अशी करते.

१) प्रत्यक्ष : निदोषार्थेद्रियसंनिकर्ष: प्रत्यक्षं ( प्र .ल ) - निर्दोष इंद्रियांचा निर्दोष वस्तूशी व विषयांशी संबंध आला कि होणारे ज्ञान हे निर्दोष असते. प्रत्यक्ष ज्ञान सात प्रकारचे आहे. पाच बाह्येन्द्रिये म्हणजे डोळा कान नाक त्वचा जीभ आणि दोन अंतर इंद्रिये मन व साक्षी ह्या द्वारे झालेले ज्ञान. मन सुख दु:ख आनंद इ. चा अनुभव करते. साक्षी म्हणजे जाणणारा( knower ) किंवा स्वत:चा अनुभव. ते स्वयंसिद्ध आहे म्हणून स्वत:प्रमाण आहे. बाकी प्रमाणे खरी व खोटी आहेत हे साक्षीप्रमाण पडताळून बघते व त्याची खरे खोटे पणाची पावती देते. त्यामुळे साक्षी सर्वश्रेष्ठ प्रमाण आहे.

**अनुमान :-** मध्वाचार्य अनुमानाची व्याख्या अशी करतात “ निर्दोषापपत्तिनुमान ” म्हणजे निर्दोष विधान. विधानात खालील दोष असतात. १) विरोध २) आधिक्य ३) न्यूनता ४) असंगती. अनुमान तीन प्रकारचे आहे. कार्यानुमान, कारणानुमान, अकार्यकारणानुमान.

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– II Nov – Dec 2022

OPEN ACCESS Original Research Article

आगम व शब्दप्रमाण :- मध्वाचार्य आगमाची व्याख्या " निर्दोषशब्द आगम " अशी करतात. आगम अपौरुषेय आणि पौरूषेय असे दोन प्रकारचे आहे. वैदिक परंपरा , मीमांसा व वेदान्तदर्शन हे वेदांना नित्य आणि अपौरुषेय असल्याने निर्दोष मानते. त्यामुळे ते स्वतः प्रमाण आहेत. पौरूषेय आगमात आप्त वाक्य , रामायण , महाभारत , पंचरात्र इ. चा समावेश होतो. द्वैत वेदांत, वेदांनाच नव्हे तर वर्णांना सुद्धा नित्य (eternal ) मानतात.

**तत्त्व मीमांसा**

मध्वाचार्यांनी सत किंवा सत्याची दोन भागात विभागणी केली. त्यांच्या मते प्रमेय म्हणजे दोन तत्त्वे आहेत. एक स्वतंत्र आणि दुसरे परतंत्र.

स्वतंत्र - ब्रह्म म्हणजे विष्णू एकच तत्त्व स्वतंत्र आहे. बाकी इतर ( जीव , जगत इ. ) तत्त्वे परतंत्र आहेत म्हणजेच ब्रह्माच्या अधीन आहेत. विष्णू तत्त्व एकाच स्वतंत्र तत्त्व असून असंख्य अनंत कल्याण गुणकारी गुणांनी परिपूर्ण आहे. बाकी सर्व तत्त्वे त्याच्यावर ( अस्तित्व, ज्ञान, प्रवृत्ती, आनंद इ. बाबतीत ) अवलंबून आहे. परंतु विष्णू तत्त्वाची सत्ता , अस्तित्व ,ज्ञान , प्रवृत्ती आनंद स्वतंत्र असून दुसऱ्या कुठल्याही तत्त्वावर अवलंबून नाही. त्याचे अधिपत्य स्वतंत्र असून ते एकमेव, अद्वितीय आहे

परतंत्र तत्त्वाची विभागणी खालील प्रमाणे केली आहे.

**चेतन आणि अचेतन हे परतंत्राचे दोन विभाग**

१) चेतन वर्गात श्रीलक्ष्मी ( वा श्रीविष्णू ची पत्नी ) आणि तीन प्रकारचे जीव ( मुक्तियोग्य , नित्यसंसारी , तमोयोग्य

२) अचेतन तत्त्वाची भाव व अभाव अशी विभागणी आहे. भाव वर्गात नित्य म्हणजे वेद , वर्ण आणि अव्याकृत आकाश , नित्यानित्य म्हणजे वेदोतर ग्रंथ ( पुराणे इ. ) , अनित्य म्हणजे २४ तत्त्वे.

अभाव तत्त्वाचे प्रागभाव , प्रध्वङ्गभाव आणि सदाभाव असे तीन प्रकार केले आहेत.

द्वैत वेदान्ताच्या मते पदार्थ दहा प्रकारचे आहेत.

१) द्रव्य २) गुना ३) कर्म ४)सामान्य ५) विशेष ६) विशिष्ट ७) अंशी ८) शक्ती ९) सादृश्य १०) अभाव

द्रव्ये वीस प्रकारची मानली आहेत.

१) परमात्मा २) श्रीलक्ष्मी ३) जीव ४) अव्याकृत आकाश ५) प्रकृती ६) गुणत्रय ७) महत ८) अहंकार ९) बुद्धी १०) मन ११) इंद्रिये १२) तन्मात्रा १३) महाभूते १४) ब्रह्माण्ड १५) अविद्या १६) वर्ण १७) तन १८) वासना १९)काल २०) प्रतिबिंब

वेदांत तत्त्वज्ञानात ब्रह्म ,लक्ष्मी, जीव व जगात ह्यांचा विचार प्रामुख्याने केला गेला आहे.

परतंत्र तत्त्वाची विभागणी खालील प्रमाणे केली आहे.

चेतन आणि अचेतन हे परतंत्राचे दोन विभाग

१) चेतन वर्गात श्रीलक्ष्मी ( वा श्रीविष्णू ची पत्नी ) आणि तीन प्रकारचे जीव ( मुक्तियोग्य , नित्यसंसारी , तमोयोग्य

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– II Nov – Dec 2022

OPEN ACCESS Original Research Article

२) अचेतन तत्त्वाची भाव व अभाव अशी विभागणी आहे. भाव वर्गात नित्य म्हणजे वेद , वर्ण आणि अव्याकृत आकाश , नित्यानित्य म्हणजे वेदोतर ग्रंथ ( पुराणे इ. ) , अनित्य म्हणजे २४ तत्त्वे.

अभाव तत्त्वाचे प्रागभाव , प्रध्वज्ञभाव आणि सदाभाव असे तीन प्रकार केले आहेत.

द्वैत वेदान्ताच्या मते पदार्थ दहा प्रकारचे आहेत.

१) द्रव्य २) गुना ३) कर्म ४)सामान्य ५) विशेष ६) विशिष्ट ७) अंशी ८) शक्ती ९) सादृश्य १०) अभाव

द्रव्ये वीस प्रकारची मानली आहेत.

१) परमात्मा २) श्रीलक्ष्मी ३) जीव ४) अव्याकृत आकाश ५) प्रकृती ६) गुणत्रय ७) महत ८) अहंकार ९) बुद्धी १०) मन ११) इंद्रिये १२) तन्मात्रा १३) महाभूते १४) ब्रह्माण्ड १५) अविद्या १६) वर्ण १७) तन १८) वासना १९)काल २०) प्रतिबिंब

वेदांत तत्त्वज्ञानात ब्रह्म ,लक्ष्मी, जीव व जगात ह्यांचा विचार प्रामुख्याने केला गेला आहे.

ते सुधारण्यात मदत करा!

**ब्रह्म किंवा ईश्वर ( विष्णू )**

इतर वेदान्ताच्या शाखांप्रमाणे द्वैत वेदांत सुद्धा ब्रह्म हीच अंतिम सत्ता आहे असे मानतात. मध्वाचार्यांनी आपल्या ब्रह्मसूत्र भाष्यात " ब्रह्म शब्दश्च विष्णोदेव " असे म्हटले आहे. अर्थ ब्रह्म म्हणजेच विष्णू .. आपल्या विष्णुतत्त्व विनिर्णय ह्या ग्रंथात त्यांनी विष्णू सर्वोत्तम आहे हे खालील मुद्द्यांवरून मांडले आहे.

१) विष्णू स्वतंत्र , सर्वज्ञ , सर्वशक्तिमान आहे.

२) विष्णू क्षर आणि अक्षर दोहोंहून भिन्न असून श्रेष्ठ आहे. त्यामुळे त्यास पुरुषोत्तम म्हणतात.

३) सर्व तत्त्वे विष्णूवर अवलंबून असून परतंत्र आहेत.

४) विष्णू निर्दोषरहित व अनंत कल्याणकारी असंख्य गुणांनी परिपूर्ण आहे.

५) विष्णू शुद्ध ,बुद्ध , नित्य , मुक्त आहे.

६) विष्णू फक्त उत्पत्ती , स्थिती व संहारच नाही तर नियमनही करतो. सर्व ज्ञान, अज्ञान, बांध व मोक्षही तोच देतो.

७)तो सर्व नाम आहे. उपनिषदे त्यास सतचित आनंद स्वरूप म्हणतात.

८) तो सकल शब्दवाच्य आहे. सर्व वेदांनी त्याची महती गायली आहे.

विष्णू किंवा ब्रह्म हे द्वैत वेदांत मते जगताचे निमित्त कारण आहे आणि प्रकृती हे उपादान कारण आहे.

वरील सर्व कारणांमुळे जीवाने आपल्या मोक्षाकरिता विष्णूची भक्ति करावी असे मध्वाचार्य म्हणतात .भक्ती हे श्रेष्ठ साधन मानले आहे.

वैष्णव संप्रदाय विष्णूच्या खालील रूपांत विष्णूला बघतो.

१) अवतार २) बिम्ब ३) व्यूह ४) विभूती ५) अर्च

श्रीलक्ष्मी देवता तारतम्याप्रमाणे श्रीलक्ष्मी म्हणजेच विष्णूची पत्नी हीच क्रम विष्णूनंतरचा आहे. ती नानारूपात प्रकट होते. ती नित्य मुक्त आहे. तिच्या खालोखाल ब्रह्म , वायू इ. चा क्रम लागतो.

**जीवोत्तम किंवा मुख्यप्रमाण ( वायू )**

द्वैत वेदांतात वायूला जीवोत्तम असे म्हटले आहे. त्याच्या कृपेने जीवास श्रीविष्णूचा अनुग्रह मिळतो असे द्वैत वेदांत मानते. म्हणून त्याचीही उपासना करतात.

**जगत सत्य**

मध्वाचार्यांनी तत्त्वज्ञानात एक महत्वाचा मुद्दा मांडला. तो म्हणजे आपण ज्यात वावरतो , जगतो, अनुभवतो ते खऱ्याखुऱ्या अर्थाने, परमार्थाने खरेच आहे. हे त्यांनी प्रत्यक्ष प्रेमं, श्रुती आणि गीता ह्यांच्या पुराव्यावर सिद्ध केले. ज्यांनी शांकर मताच्या मायावादाचे खंडन करून जगत सत्य असून ( जरी अनित्य आहे तरी ) ते मिथ्या नाही हे अनेक युक्तिवादाने व बुद्धिचातुर्याने सिद्ध केले.

**जीव**

द्वैत वेदांताप्रमाणे जीव अनेक आहेत. प्रत्येक जीव एक दुसऱ्याहून भिन्न आहे. हे भिन्नत्व जीवाच्या मोक्षानंतरही असते. प्रत्येक जिवंत स्वरूपभेद असतो. त्याप्रमाणे तो कर्मे करतो व त्याचे फल उपभोगतो. त्याचे ज्ञानही भिन्न असते. मुक्तीनंतरचा जो आनंद आहे तो जीवाच्या स्वरुपयोग्यतेनुसार कमी अधिक असतो.

जीवाचे सामान्यतः तीन प्रकार आहेत.

१) मुक्तियोग्य - देव , साधू संत इ. ह्या प्रकारात येतात. मुक्तियोग्य सात्विक असतात.

२) नित्यसंसारी - हे असंख्य असून मिश्रगुणाचे आहेत. ते जन्म मृत्यूच्या फेऱ्यात अडकलेले असतात , त्यामुळे सुख आणि दुःखाचा अनुभव करतात.

३) तमोयोग्य - हे जीव तमोगुणी असून त्यात द्वैव राक्षस पिशाच्च इ. तमोवृत्तीचे जीव असतात.

जीव हे परमात्म्याचे प्रतिबिंब असून परमात्मा बिंब आहे. जीव हे परमात्म्याचे अनुचर असल्याने त्यांनी परमात्म्याची भक्ती करावी.

मोक्ष किंवा मुक्ति

वेदान्तदर्शन मोक्षास परमोच्च पुरुषार्थ मानते. द्वैत वेदांतही ह्या मताचा स्वीकार करते. द्वैतांच्या मते बंध व मोक्ष दोन्हीही वास्तविक आहेत. ते ईश्वर इच्छेनेच होतात. काल , कर्म , प्रकृती , अविद्या हि जड असल्याने चेतन जिवाच्या बंधनाचे स्वतंत्र कारण होऊ शकत नाही.

मोक्ष म्हणजे "निजसुखानन्नी:" ह्याचा अर्थ मोक्ष म्हणजे स्वतःच्या स्वरूपामधल्या आनंदाची अनुभूती. त्यांनी मोक्षातील कर्मक्षय, उत्क्रांती, लयभाग, भोग असे चार टप्पे सांगितले आहेत.

भोगाच्या सालोक्य, सानिध्य, सारुप्य आणि सायुज्य अशा चार मुक्तीच्या पायऱ्या असून सायुज्य ही सर्वश्रेष्ठ मुक्ती आहे.

मध्वाचार्यांच्या मते सायुज्य मुक्तीत सुद्धा जीव आणि ईश्वर ह्यात भेद राहतो. तसेच एक जीव दुसऱ्याहून भिन्न मोक्षानंतरही राहतो कारण त्यांचा स्वरूपानंद भिन्न असतो.

**भक्ती**

इतर वैष्णव आचार्यांप्रमाणे मध्वाचार्यांनी सुद्धा भक्ती हात ईश्वरकृपेचे व मोक्षाचे प्रमुख साधन मानले आहे. ह्यास ईश्वर प्रसाद किंवा अनुग्रह असेही म्हणतात. ते भक्तीची व्याख्या अशी करतात,

" माहात्म्यज्ञानपूर्वस्तु सुदृढ: सर्वतोधिक: ।
स्नेहो भक्तिरिती पोक्तस्तया मुक्तिर्नचान्य या ॥"

भक्ती म्हणजे ईश्वराच्या माहात्म्याविषयी असलेले ज्ञानपूर्वक अचल, अढळ व सर्वाधिक स्नेह किंवा प्रेम. अशा भक्तीनेच मुक्ती मिळते. अन्यथा नाही.

वेदांतात विराग , सम , दम , श्रवण , मनन ,निवृत्त कर्म , विवेक , गुरुभक्ती , गुरुकुल निवास अश्या अनेक साधना अपरोक्षासाठी सांगितल्या आहेत पण साधनेच्याप्रत्येक टप्प्यावर भक्तीची आवश्यकता आहे. भक्तीने ज्ञानाची व वैराग्याची प्राप्ती होते. त्यातून भक्ती पक्व होते व अचल होते त्यामुळे अपरोक्ष आणि मुक्ती मिळते. ती पुन्हा पराभक्ती देते. स्वसुखाची अनुभूती होते.

मध्वाचार्यांच्या मते भक्ती विष्णूच्या सगुण रूपाची वा त्याचे अवतार किंवा रूपे ह्यांची करावी, कारण " विष्णू सर्वोत्तम आहे त्याच्या अनुग्रहासाठी श्री आणि मुख्यप्राणाचीही कृपा घ्यावी. मध्वाचार्यांनी नवधा भक्ती मान्य केली आहे. त्यात श्रवण ,कीर्तन, गुरुचे पादसेवन , नामस्मरण , त्रिकाल संध्यावंदन , दास्यभक्तीला व शरणागतीला विशेष महत्व दिले आहे.

**Cite This Article:**
***डॉ. मिता मोहन शेणॉय,** *(2022)* द्वैत वेदांत : विचार व तत्त्वज्ञान,***Electronic International Interdisciplinary Research Journal,*** *Volume No. XI (Special Issue-II), 180-185.*